



www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–12 ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. सोमवार, 24 नोव्हेंबर 2025 ■ किंमत 2 रुपये, पाने –4



# शीख समाजाचे नववे गुरु तेगबहादूर यांच्या शहीदी दिनाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

'हिंद की चादर'

## 'एक नाम सतनाम...', 'वाहे गुरुजी दा खालसा...'



**दिनेश परदेशी – छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शीख समाजाचे नववे गुरू तेगबहादूर यांच्या शहीद होण्याला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने चारदिवसीय महोत्सवाचे आयोजन शहरातील शीख बांधवांनी केले आहे. शनिवारी नगरकीर्तन काढण्यात आले. रविवार, २३ नोव्हेंबर रोजी वाहन रॅलीने लक्ष वेधले. यामध्ये जवळपास शेकडो दुचाकी आणि चारचाकी घेऊन शीख बांधव सहभागी झाले होते. सिंधी कॉलनी येथील श्री गुरू तेगबहादूसाहिब गुरुद्वारातून निघालेली वाहन रॅली संपूर्ण शहरात साडेतीन तास फिरून परतली. गुरूंनी धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदानाला या वेळी उजाळा देण्यात आला. 'एक नाम सतनाम...', 'वाहे गुरुजी दा खालसा...' अशा घोषणा या वेळी देण्यात आल्या. गुरुद्वारामध्ये अखंड पाठ कीर्तनाला सुरुवात झाली आहे. यासोबत रविवारची विशेष संगतही घेण्यात आली. गुरूंनी दिलेले वचन तसेच धर्मरक्षणासाठी केलेला प्राणांचा त्याग याकडे लक्ष वेधण्यात आले. रात्री भाई कमलदीपसिंह चंबावाले यांचे कीर्तन झाले. यानंतर दिल्लीतील भाई जसपाल सिंहजी यांचे कीर्तन झाले.



## दलेरेसिंग खालसा इंटरनॅशनल ग्रुपचे सदस्य सुखदेव सिंह यांचे संभाजीनगरात स्वागत



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

७.५ फूट उंची आणि २१२ किलो वजन असलेले सुखदेव सिंह यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये हजेरी लावली. ते गुरू तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहिदी दिनानिमित्त सिंधी कॉलनीतील गुरुद्वारात काढण्यात येणाऱ्या नगरकीर्तनात सहभागी होण्यासाठी आले होते. या अफाट शक्तीच्या मालकाचे ६ आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड (गिनीज, अमेरिकन, एशिया, यूएसए, इंडिया बुकसह) आहेत. ते पंजाबमधील नवा शहर या गावचे शेतकरी कुटुंबातील आहेत. एकाच वेळी दोन्ही हातांनी १६ बुलेट ओढण्याचा विक्रम त्यांनी केला आहे. सुखदेव सिंह म्हणाले, 'लोक मला पाहून यह ढाई किलो का नाही, १५ किलो का हात आहे' म्हणतात. विशेष म्हणजे इतकी प्रचंड शरीरयष्टी असूनही ते फक्त दोन पोळ्या खातात, पण दररोज ६ लिटर दूध पितात. पंजाब शुटिंग शर्टिंगतर्फे त्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.




" आंतरराष्ट्रीय विक्रमवीर सुखदेव सिंह यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये गुरू तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहिदीदिनानिमित्त सिंधी कॉलनीतील गुरुद्वारात काढण्यात येणाऱ्या नगरकीर्तनात आपल्या अन्य सहकाऱ्यांसह सहभाग घेतला होता. यांनी चौकचौकात चित्तथरारक, अंगावर काटा येईल असे प्रात्याक्षिक सादर केले. सुखदेव सिंह यांनी सर्व छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांचे तसेच आयोजकांचेही आभार मानले. आपल्या देशाप्रती जेव्हा जेव्हा संधी येईल तेव्हा तेव्हा ती देशभक्ती प्रगट करावी, असे **आंतरराष्ट्रीय विक्रमवीर सुखदेव सिंग** यांनी **अट्टलमतचे कार्यकारी संपादक दिनेश परदेशी** यांच्याशी बोलताना सांगितले.

# गुरु श्री गुरु तेगबहादूरजी शहिदी दिनानिमित्त उत्सवाचे २५ नोव्हेंबर रोजी सांगता

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शिख समाजाचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादूर साहेबजी यांच्यासह, भाई मतीदासजी, भाई सतिदासजी आणि भाई दयालाजी यांनी धर्म, मानवी मुल्य तसेच आदर्श आणि सिद्धांतांचे रक्षण करण्यासाठी प्राणांचे बलिदान दिले.त्यांच्या बलिदानाला उजाळा देण्यासासाठी शिख समाजाच्यावतीने चार दिवसीय उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दि.२२ ते २५ नोव्हेंबर दरम्यान हे कार्यक्रम होते. याविषयी माहिती देण्यासाठी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सिंधी कॉलनी गुरुद्वाराचे अध्यक्ष जगदेव सिंह गुरुदत्ता,उस्मानपूरा येथील गुरुद्वारा श्री.गुरुसिंह सभाचे अध्यक्ष हरविंदरसिंह बिंद्रा आणि धावणी महोल्ला येथील भाई दयासिंग भाई धरमसिंह गुरुद्वाराचे अध्यक्ष नरेंद्रसिंह जबिंदा यांची उपस्थिती होती. यामध्ये २२ नोव्हेंबरला सायंकाळी ५ वाजता नगर किर्तन झाले. सिंधी कॉलनीतील गुरु तेगबहादूर नगर येथून नगरकिर्तनाला सुरुवात होवून धावणी महोल्ला येथील भाई दयासिंगजी भाई धरमसिंहजी गुरुद्वारा येथे क्रांतीचौक मार्गे नगरकिर्तन पोहचेली. यानंतर लंगरचे आयोजनही केले होते. २३ नोव्हेंबर (रविवारी) सकाळी श्री गुरु गोविंदसिंहजी यांच्या गुरुतागद्दी निमित्त विशेष किर्तनाचे झाले. सकाळी ८ ते ९ वाजेदरम्यान अखंड पाठाची सुरुवात होवून यानंतर दुचाकी आणि चारचाकी वाहन रॅली काढण्यात आली. ७ वाजून १५ मिनीटांनी चंबा येथील भाई कमलदिपसिंहजी यांचे किर्तन होईल. रात्री ८.३० वाजता दिल्ली येथील किर्तनकार भाई जसपाल सिंहजी यांचे किर्तन होणार आहे.

२४ नोव्हेंबरला सकाळी भाई मतिदासजी, भाई सतिदासजी आणि भाई दयालाजी यांच्या शहिदीनिमित्त सकाळी ८ ते ९ वाजेदरम्यान किर्तन आणि लंगरचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजून १५ मिनीटांनी कुलदिपसिंहजी तर ८ वाजून ३० मिनीटांनी भाई जसपाल सिंहजी यांचे विशेष किर्तन होणार आहे. यानंतर लंगरचेही आयोजन करण्यात आले आहे. २५ नोव्हेंबरला या उत्सवाची सांगता झाली. सकाळी ८.३० वाजता अखंडपाठाचा समारोप होईल. यानंतर गुरु श्री तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहिदी निमित्त सकाळी १०.३० वाजता किर्तन संगत आयोजित केली आहे. यानंतर गुरुचे लंगरचे आयोजन करण्यात आले. याठिकाणी दुपारी १ ते अडीच वाजेदरम्यान लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी येणार आहेत.या उत्सवात चारही दिवस विविध समाजाच्या बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्यावतीने संपूर्ण कार्यकारिणीने केले आहे. ह्या शहिदी दिनाचे संपूर्ण देशात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ह्या कार्यक्रमासाठी सहकार्य केले असून आज पर्यंत कोणत्याही सरकारने लाल किल्ला, दिल्ली येथे कोणताही धार्मिक कार्यक्रमाला परवानगी दिली नाही.परंतू यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ला, दिल्ली येथे शहिदी दिनाला परवानगी दिली असल्याने भारतीय जनता पार्टी चे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही आभार मानले.तसेच शहरातील चार दिवसीय कार्यक्रमात शहरातील पालकमंत्री, मंत्री महोदयासह,आमदार, खासदार, नगरसेवक आणि इतर सर्व राजकीय, सामाजिक पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी तिन्ही गुरूद्वारांचे सचिव,सदस्य, सर्व उपस्थितांचे व तसेच पत्रकारांचे आभार मानले.

## श्री गुरू तेगबहादूरजी यांचा शहिदी दिन आयुष्यात कधीच विसरू शकत नाही - गुरप्रीतसिंग बग्गा

" 'वाहे गुरु का खालसा श्री गुरु तेग बहादूर जी यांना 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाते, कारण त्यांनी धर्म आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी



अद्वितीय बलिदान दिले. ते शीख धर्माचे नववे गुरु होते, ज्यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे झाला. त्यांनी धार्मिक छळ आणि अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि 'हिंद दी चादर' (भारताचे कवच) म्हणून गौरवले जातात. छत्रपती संभाजीनगरातील सर्व शिख बांधवांच्या प्रार्थना स्थळांचे (गुरूव्दाराचे) अध्यक्ष, सचिव, सदस्य गुरूवर्य हे वर्षभरात येणारे सर्वच कार्यक्रमांचे आयोजन सुंदर व नियोजनबद्ध पद्धतीने करतात त्यात त्यांचा हातखंडा आहे. श्री गुरू तेगब हादूरजी यांचा ३५० वा शहिदी दिन तर आयुष्यात कधीच विसरू शकत नाही. सर्व समाजातील नागरिक यात सहभागी झाले. गुरूव्दारांमध्येही सर्व सेवेदारांनी तन मन धनाने सेवा केली. ही सर्व गुरूंची कृपा आहे. करणारा तोच आहे. आम्ही फक्त निमित्त मात्र आहोत.

**- गुरप्रीतसिंग बग्गा (हॉटेल बग्गा इंटरनॅशनल)**

## आरक्षणाच्या बाबतीत घोळ का? सरकारने कायद्याचा सल्ला का घेतला नाही?

देशातील कोणतीही सरकार असो,सरकार म्हटले की,राज्याची व तेथील जनतेची मोठी जबाबदारी सरकारवर व सत्ताधाऱ्यांवर असते.परंतु राजकीय पोळी शेकण्यासाठी स्वमताने आरक्षण जाहीर करणे किंवा कोणतेही काम करणे हा तर कायद्याने मोठा गुन्हा आहे असे मला वाटते. विरोधक किंवा याचिका करता प्रत्येक सरकारच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या चुका काढत असतात आणि काढल्याच पाहिजे कारण हा लोकशाहीचा अधिकार आहे. परंतु आरक्षण जाहीर करतांना सरकारने कायदा,विरोधक, सामाजिक संघटना, बुध्दीजीवी, समाज यांच्याशी सविस्तर चर्चा किंवा विचार-विमर्श का केली नाही? सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून जर आरक्षण जाहीर केले असते तर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला आरक्षणाचा सवालच केला नसता.माझ्या माहिती नुसार ओबीसी -२७ टक्के आरक्षण,एसी-१३ टक्के आरक्षण, एसटी -७ टक्के आरक्षण आणि एनटी/व्हिजे-३ टक्के आरक्षण अशाप्रकारे एकुण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा कायद्यानुसार ठरविण्यात आली आहे.परंतु कायद्याचा किंवा सर्वोच्च न्यायालयाशी सल्लामसलत न करता सरकारने आपल्या मर्जीने होवून घातलेल्या निवडणुकीमध्ये आरक्षण जाहीर केले ही तर सरळ-सरळ कायद्याची पायमल्लीच म्हणावी लागेल. राज्यातील ४२ नगरपंचायती आणि २४६ नगरपरिषद निवडणुकीत आरक्षणाच्या घोळामुळे टांगती तलवार आजही कायम असल्याचे दिसून येते.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाने ५० टक्के मर्यादा ओलांडल्याने सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली आहे.सरकारने ८३ पंचायत समित्या,१७ जिल्हापरिषदा,५७ नगरपालिका, आणि २ महानगरपालिका अशाप्रकारे १५९ ठिकाणी ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली आहे. आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.नंदुरबार जिल्हा परिषदेमध्ये एकूण आरक्षण १०० टक्के, पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के तर अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आहे.नागपूर, ठाणे, वाशिम, नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्ह्य परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे.या आरक्षणाच्या विरोधात २८ याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. सरकारने जर आरक्षणाचा घोळ निर्माण केला नसता तर हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेलाच नसता.परंतु सरकारने आरक्षणाला व नियमाला काडीमोड केल्याने हा मुद्दा उपस्थित झालेला आहे हे स्पष्ट दिसून येते.निवडणूक आयोग सुध्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिक्षेत आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबरला सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेते याकडे राज्य निवडणूक आयोगासह सर्वांचेच लक्ष लागले आहे.न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही असे चित्र दिसत आहे.सरकारच्या चुकीमुळे निवडणुकांची अनिश्चितता निर्माण झाली आहे.यामुळे राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवार यांची परिस्थिती तळ्यात नि मळ्यात झाल्याची दिसून येते. भारतात लोकशाही आहे त्यामुळे सरकारने कायद्याचा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करावा व भविष्यात अशाप्रकारेचे घोळ किंवा चुका निर्माण होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.जय हिंद.

# हिंद की चादर गुरु तेग बहादूर : मानवतेचे रक्षक

भारतीय संस्कृतीचा आणि मानवतेच्या इतिहासाचा अभ्यास करताना काही व्यक्तिमत्त्वे अशी भेटतात की ज्यांचे जीवन, विचार, आणि बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे शीख धर्माचे नववे गुरु 'गुरु तेग बहादूर' होते. २४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारत देश त्यांच्या बलिदानाची, त्यांच्या मूल्यांची आणि त्यांच्या अद्वितीय मानवतावादी विचारांची स्मृती जागवतो. हा दिवस केवळ एका धार्मिक गुरूच्या हौतात्म्याचा दिवस नाही, तर मानवी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मगौरवासाठी प्राणार्पण करणाऱ्या महापुरुषाचा वैश्विक स्मरणदिन आहे.



गुरु तेग बहादूर यांचे संपूर्ण जीवन हे सामाजिक बांधिलकी, समता, दीनदुबळ्यांचे रक्षण, शांतता, अध्यात्म आणि संघर्षातील धैर्याचे प्रतीक आहे. इतिहासात अनेक योद्धे लढले, अनेक सम्राटांनी सत्ता मिळवली, अनेक विद्वानांनी ज्ञान दिले, परंतु एखाद्याच्या धर्म, संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी स्वतः चा जीवदान देणारी व्यक्ती विरळच आढळते. गुरु तेग बहादूर यांचे बलिदान हा जगाच्या इतिहासात अभूतपूर्व प्रसंग आहे.

गुरु तेग बहादूर यांच्या काळातील भारत देश हा राजकीय संघर्ष, धार्मिक अंधश्रद्धा, जातिभेद, आणि अत्याचाराच्या छायांनी वेढलेले होता. मुगल सत्तेचा प्रभाव वाढत होता, आणि औरंगजेब धर्मांतराच्या धोरणातून इस्लामीकरणाचा प्रसार करू इच्छित होता. हिंदू, जैन, सूफी, बौद्ध आणि अनेक समुदायांवर धर्मांतराचा दबाव वाढत होता. काश्मीरच्या विद्वान पंडितांनी आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी दिल्ली नव्हे, तर पंजाब गाठले आणि तेथे त्यांनी आशेचा किरण म्हणजे गुरु तेग बहादूर यांना भेटले. त्यांच्या वेदनादायी कथा ऐकून गुरुजींनी जो निर्णय घेतला, तो इतिहासातील सर्वात मोठा न्याय, स्वातंत्र्य आणि मानवतेचे रक्षण करणारा निर्णय ठरला.

गुरु तेग बहादूर यांनी समतेवर आधारित समाज बांधण्यासाठी श्रद्धेची शक्ती, क्षमेचे दर्शन आणि न्यायाची भावना जोपासली. त्यांच्या शिकवणींमध्ये भीतीवर मात हे केंद्रस्थानी होते. स्वतःच्या ग्रंथांत त्यांनी लिहिले आहे की जो डरता नाही, जो दुसऱ्याला घाबरवत नाही, तोच खरा ज्ञानी आणि मुक्त आहे. त्यांचा संदेश स्पष्ट होता की मनुष्याने मुक्त जगावे. त्याची श्रद्धा, अस्तित्व आणि स्वाभिमानावर कुणाचाही अंमल चालू नये. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू समाजाचा सर्वांगीण विकास हा होता. अनेक स्थळी त्यांनी गुरुद्वारे स्थापन करून 'लंगर' या परंपरेला अधिक बळ दिले. लंगर ही केवळ भूक भागविण्याची पद्धत नव्हती, तर समता, बंधुता आणि जातिनिरपेक्ष सामाजिक एकतेचा प्रयोग होता. त्या काळातील जातिव्यवस्थेच्या कठोरतेला धक्का देणारी ही सामाजिक क्रांतीच होती. एका थाळीत श्रीमंत-गरीब, हिंदू-मुस्लिम, ब्राह्मण-शूद्र, राजा-प्रजा सगळ्यांनी बसून भोजन करणे हा एक मौन सामाजिक संदेश होता. या संदेशामधून मानवात भेद नाही. हे स्पष्ट होत होते.

गुरु तेग बहादूर यांची समाजकार्याची दृष्टी केवळ धार्मिक मर्यादांपुरती नव्हती. त्यांनी अनेक गावांत विहिरी, तलाव, रस्ते, विश्रामगृहे आणि आश्रयधामे बांधली. त्यांच्या शिकवणीत मानवी समतोल, मानसिक शांती आणि सामाजिक जबाबदारी या तीन स्तंभांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी लोकांना ध्यान, संयम आणि निष्ठेने जीवन जगण्याची प्रेरणा दिली.

त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अध्यात्मिक नव्हते; ते एक शूर योद्धेही होते. त्यांच्या बालपणातच 'गुरु हरगोबिंद साहिब' यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शौर्य, अस्त्र-शस्त्र प्रशिक्षण आणि राष्ट्रसेवेचे धडे घेतले. त्यामुळेच, जेव्हा स्वातंत्र्यावर गदा येत होती, तेव्हा त्यांनी मौन साधना नाही केली, तर थेट अन्यायाच्या विरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतला. आणि मग आला इतिहासातील अंधाऱ्या अत्याचारांचा क्षण. जेव्हा काश्मीरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी स्वतःचा जीव अर्पण करण्याचे ठरवले. त्यांनी औरंगजेबाला स्पष्ट संदेश दिला होता की, जर मी धर्मांतर केले तर लाखो हिंदू धर्मांतर करतील, आणि जर मी प्राण दिले तर भविष्यात कोणीही धर्मावर अत्याचार करण्याचे धाडस करणार नाही.

दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या कारागृहात त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले, पण त्यांनी धर्म, न्याय आणि स्वातंत्र्य यांची बाजू सोडली नाही. २४ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. आज त्या ठिकाणी उभे असलेले 'गुरुद्वारा शीश गंज साहिब' हे केवळ धार्मिक स्थळ नाही तर ते 'मानवी हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे स्मारक आहे. त्यांच्या बलिदानाचा प्रभाव भारतीय समाजात आणि जगभरातील मानवतावादी विचारांतून दिसून येतो. भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराचा बीजकण गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानातूनच उगवलेला दिसतो. ते जगाला शिकवून गेले की ङ्गस्वत:साठी जगणारा सामान्य असतो, परंतु दुसऱ्याच्या स्वाभिमानासाठी प्राण देणारा अमर असतो.ङ्घ

आजच्या काळात गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला काही महत्त्वपूर्ण मूल्ये सांगते, ते म्हणजे समाजाला समता हवी, भीती नव्हे; संवाद हवा, संघर्ष नव्हे; मानवता हवी, हिंसा नव्हे; मन मुक्त हवे, शरीर नाही.

धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली अजूनही जगात हिंसा घडते. जात, धर्म, वंश, भाषा यावरून अजूनही संघर्ष होतात. अशा काळात गुरु तेग बहादूर यांचे बलिदान आपल्याला आठवण करून देते की 'मानवता सर्वात श्रेष्ठ धर्म आहे.' त्यांचे बलिदान हा केवळ इतिहासातील प्रसंग नाही तर तो न्याय, स्वातंत्र्य, विविधता आणि मानवतेच्या स्वीकाराचा एक जिवंत संदेश आहे.

आज, त्यांच्या शहीद दिनानिमित्त भारतासह जगभरातील समाज एक प्रश्न विचारतो की 'आपण मानवतेचे रक्षण करण्यासाठी कितपत तयार आहोत?' गुरु तेग बहादूर आपल्याला शिकवतात की समाजातील दुर्बल, शोषित, पीडित वर्गासाठी आवाज उठवणे ही केवळ जबाबदारी नाही तर ते एक मानवी कर्तव्य आहे. त्यांच्या जीवनाने दाखवून दिले की धर्म म्हणजे इतरांचा धर्म नष्ट करणे नव्हे, तर प्रत्येकाच्या श्रद्धेचा सन्मान करणे होय. त्यांचे स्मरण केवळ धार्मिक नाही तर ते राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी वारसा आहे. आजचा दिवस हा केवळ त्यांच्या शहादतीचा स्मरणदिन नाही, तर त्यांच्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा दिवस आहे.

गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे जळणारे दीप आहे 'जे अंधारातही प्रकाश देते, भीतीतही आत्मविश्वास देते, आणि संघर्षातही सत्य न सोडण्याची प्रेरणा देते. या महान विभूतीला विनम्र अभिवादन.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकीसाठी यंत्रणा सुसज्ज ठेवा -जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात होणाऱ्या नगरपालिका आणि नगरपरिषद मतदान प्रक्रियेसाठी नगरपालिका, पोलीस आणि महसूल या तिन्ही यंत्रणाने योग्य समन्वय ठेवून मतदान प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक होण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेऊन यंत्रणा सुसज्ज ठेवावी असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दूरदृष्टी प्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याशी ऑनलाइन संवाद साधत निवडणूक यंत्रणेबाबतचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातून नगरपालिका मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव उपस्थीत होते. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, पैठण फुलंब्रीच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, कन्नड, वैजापूर , पैठण गंगापूर, सिल्लोड या नगरपालिकेचे मुख्याधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

मतदारांच्या मतदानाच्या दिवशी योग्य सेवा सुविधा देण्याबरोबरच मतदान केंद्रांची पाहणी आणि सुसज्जता याबाबत विशेष लक्ष द्यावे . त्यासाठी प्रत्यक्ष भेटी देऊन आदर्श आचारसंहिता बाबतचे पालन करण्यासाठी सर्वांनी काम करावे. जिल्ह्यात दुबार मतदार नोंदणी बाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.यासाठी केंद्र अध्यक्षांना याबाबत विशेष प्रशिक्षण आणि सूचनाचेही निर्देश देण्यात यावेत असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

नगरपालिका निवडणूक नियमावलीप्रमाणे कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवत प्रतिबंधात्मक कारवाई आणि प्रत्यक्ष बंदोबस्त याबाबतचे नियोजन संबंधित नगरपालिका हद्दीतील निवडणूक प्रक्रियेच्या यंत्रणेने करावे. नियंत्रण कक्ष याबाबत विशेष काळजी घेऊन योग्य तो पोलिस बंदोबस्त मागवण्याचे नियोजनही करावे.

मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळा महाविद्यालयात करण्याबरोबरच मतदान करण्यासंदर्भाचे आवाहन प्रसार माध्यमाच्या माध्यमातून करण्यात यावे. यामध्ये स्थानिक कलाकार, विविध व्यक्ती यांचा सहभाग करून घ्यावा.

पारदर्शकपणे निवडणूक होण्यासाठी रिस्पॉन्स टाईम किंवा प्रतिसाद वेळ हे कमीत कमी करण्यासाठीचा प्रयत्न करावा. निवडणुकीच्या प्रक्रियेत उमेदवार वेगवेगळ्या परवानग्यासाठी अर्ज करत असतात या अर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची यादी नगरपालिका कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावे, जेणेकरून उमेदवाराला आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची पूर्तता करून त्यांना परवानगी घेणे सुलभ होऊ शकते अशा सूचनाही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केल्या. नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणूक विषयी प्रसार माध्यमाला वेळेत आणि अचूक माहिती देण्यासाठी माध्यम कक्ष उभारण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

# लाडसावंगी उपबाजार पेठेमुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील

## राजस्थानचे राज्यपाल मा.श्री.हरिभाऊ बागडे नाना यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



लाडसावंगी येथे उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती छत्रपती संभाजीनगर यांच्या लाडसावंगी उपबाजार पेठचे भव्य उद्घाटन संपन्न झाले. राजस्थानचे राज्यपाल मा.श्री.हरिभाऊ बागडे नाना यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले व मा.केंद्रीय मंत्री मा.श्री.रावसाहेब पाटील दानवे दादा यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपबाजारपेठेच्या परिसरात मुख्य प्रवेशद्वाराशेजारी पेट्रोल पंप, मुख्य रस्त्यावर व्यापारी गाळे, फूड प्रोसेसिंग युनिट, कृषीमाल साठवणुकीसाठी वेअरहाऊस तसेच शेतमाल पाऊसापासून सुरक्षित राहण्यासाठी सेल हॉल अशा महत्त्वपूर्ण सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या सुविधा शेतकऱ्यांच्या दैनंदिन व्यवहारांना सुकरता मिळवून देणार असून बाजार समितीच्या कार्यक्षमता वृद्धीसाठी उपयुक्त ठरणार आहेत.

मुख्य रस्त्यालगत उभारण्यात येत असलेले शॉपिंग कॉम्प्लेक्स हे बैठका, व्यवहार आणि कृषीविषयक चर्चांसाठी एक सुसज्ज सुविधा म्हणून कार्य करणार आहे. नव्याने उभारण्यात येणारी वेअरहाऊस व्यवस्था आणि सेल हॉल कृषीमाल व्यवस्थापन व विक्री प्रक्रियेस आवश्यक ती गती देणार आहेत. यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

शेतकरी व कामगार यांच्या श्रमातून कृषीपूरक व्यवस्था सक्षम राहते. त्यांच्या हितासाठी राबविण्यात आलेली ही विकासकामे स्थैर्य, सुसंवाद आणि सर्वांगीण प्रगतीस सहाय्यभूत ठरणारी आहेत. कार्यक्रमास सभापती श्री.राधाकिसन बापू पठाडे, श्री.रामबाबा शेळके, श्री.राम राव काका शेळके, बाजार समितीचे उपसभापती श्री. मुरली अण्णा चौधरी, सर्व सन्माननीय संचालक, परिसरातील शेतकरी व पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# छत्तीसगड येथून १७ क्विंटल २५ किलो गांजा तस्करी करणाऱ्या आरोपीस मा. सर्वोच्च न्यायालयात जामीन मंजुर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्तीसगड राज्यातून तब्बल १७ क्वींटल २५ किलो गांजा महाराष्ट्रात आणून विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन आरोपीना नामे संतोष पवार व अविनाश म्हस्के यांना छत्तीसगड पोलीसांनी अटक केली होती. सदरील गुन्ह्यात त्यांच्या ताब्यातून तब्बल आठ कोटी बासष्ट लाख पन्नास हजार रुपये सरकारी किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला होता. यातील आरोपी संतोष पवार याने छत्तीसगड (बिलासपुर) उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरूद्ध माः सर्वोच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

यावेळी याप्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने संतोष पवार या आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. आरोपीस जामीन देताना सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की आरोपी हा अमली पदार्थ घेऊन जाणाऱ्या गाडी मध्ये फक्त सहायक होता. तसेच आरोपी हा १९ महिन्यापेक्षा जास्त दिवस कैदेत आहे आणि खटल्यामध्ये विशेष प्रगती नाही. या बाबींचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला. सर्वोच्च न्यायालयात आरोपीच्या वतीने अॅड. स्नेहा संजय बोटवे, अॅड. आकाश बागल व अॅड.सिद्धार्थ चपळगावकर यांनी युक्तिवाद मांडला.

# महानगरपालिकेतर्फे जागतिक मधुमेह साजरा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महानगरपालिकेचे मा.आयुक्त तथा प्रशासक जी.श्रीकांत व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ .पारस मंडलेचा ,प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.मनिषा भोंडवे यांच्या मार्गदर्शनानुसार आरोग्य विभागाच्या क्रांती चौक आरोग्य केंद्र येथे दिनांक १९/११/२०२५ रोजी जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला.

१४ नोव्हेंबर हा जागतिक मधुमेह दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी आरोग्य केंद्र क्रांती चौक येथे मधुमेह तपासणी,निदान, उपचार व उपचार न केल्याने आरोग्यावर होणारे दुष्परिणाम या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत मधुमेह तज्ज्ञ डॉ. सुनील धुळे यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.आशा उनवणे यांनी गरोदरपणात होणारा मधुमेह या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये रुग्णांचे रँडम ब्लड शुगर, एच बी ए वन सी ,इ सी जी, फंडोस्कोपी , बीएमआय आणि एनसीडी स्क्रीनिंग करण्यात आले. त्याचबरोबर सर्व स्टाफचे सी पी आर ट्रेनिंग घेण्यात आले. तीस वर्षावरील सर्व नागरिकांची रक्त तपासणी करण्यात आली.या शिबिरामध्ये एकूण १३९ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या प्रसंगी क्रांती चौक आरोग्य केंद्र येथे मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.मनिषा भोंडवे यांनी उपस्थितांना मधुमेह आजाराविषयी मार्गदर्शन केले.यावेळी सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.अमरज्योती शिंदे ,डॉ.सुनील धुळे, डॉ.आशा उनवणे, डॉ.अश्विनी सिंगू,एनसीडी सहाय्यक श्रीमती ज्योती अमोलिक,मुख्य परिचारिका श्रीमती डक तसेच सर्व परिचारिका,सर्व आशा स्वयंसेविका ,पॅरामेडिकल स्टाफ आणि नागरिक उपस्थित होते.

सदर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी क्रांती चौक येथील आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# वंचित बहुजन आघाडीच्या छत्रपती संभाजीनगर पूर्व तालुकाध्यक्षपदी श्री किशोर जाधव यांची नियुक्ती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



वंचित बहुजन आघाडीच्या छत्रपती संभाजीनगर पूर्व तालुकाध्यक्षपदी श्री किशोर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या आयोजित बैठकीत ही नियुक्ती जाहीर झाली. या प्रसंगी पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

संघटन बांधणी, समाजकारणातील सक्रिय सहभाग आणि पक्षनिष्ठा यांचा योग्य सन्मान म्हणून ही नियुक्ती करण्यात आल्याचे वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

नियुक्तीनंतर श्री किशोर जाधव यांनी दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. त्यांच्या नियुक्तीचे गावातील नागरिक, कार्यकर्ते आणि पक्षश्रेष्ठींकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# श्रीक्षेत्र वेरूळ ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याची जय्यत तयारी

**छत्रपती संभाजीनगर/खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**



**श्री बाबाजींच्या ३६ व्या पुण्यस्मरणानिमित्त जनशांती धर्म सोहळ्याचे भव्य आयोजन श्री क्षेत्र वेरूळ येथे करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व दिल्ली विधानसभेचे माजी उपसभापती आलोक कुमार यांची निष्काम कर्मयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांचे उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी भेट घेतली. यावेळी विश्व हिंदू परिषद कार्यालयात प.पू.बाबाजींचा सन्मान केला. यावेळी सुदर्शन वृत्त समूहाचे अध्यक्ष डॉ.सुरेश चव्हाणके हे उपस्थित होते.**

खुलताबाद तालुक्यातील क्षेत्र वेरूळ येथील ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांच्या ३६ व्या पुण्यस्मरण निमित्त ओम जगद्गुरु जनशांती धर्मसोळ्याचे आयोजन श्रीक्षेत्र वेरूळ येथे उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या या कार्यकाळात पार पडणार आहे या भव्य सोहळ्याची जय्यत तयारी जय बाबाजी परिवार तर्फे मोठ्या उत्साहाने सुरू आहे.

श्री क्षेत्र वेरूळ येथे श्री संत जनार्दन स्वामी आश्रम परिसरामध्ये चालू आहे आज जय बाबाजी भक्त परिवार आयोजित पत्रकार परिषदेमध्ये उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राजेंद्र पवार यांनी सोहळ्याची माहिती दिली सालाबाद प्रमाणे परमपूज्य बाबाजींचे पुण्यस्मरण जय बाबाजी भक्त परिवार स्वामी शांतिगिरी जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी मोठ्या उत्साहामध्ये साजरा करत असतो या सोहळ्याला नऊ जिल्ह्यातील ६७ तालुक्याचा प्रामुख्याने सहभाग असून महाराष्ट्र सह संपूर्ण भारतामधून अनेक पूजनीय साधुसंत व मान्यवर सहभागी होणार आहे आठ दिवस लाखो भाविकांची मंदियाली या पवित्र परिसरामध्ये होणार असून गेल्या दोन महिन्यात पासून या सोहळ्याची तयारी चालू आहे ही तयारी आता अंतिम टप्प्यात असून आश्रम परिसरामध्ये या सोहळ्याचं वैशिष्ट्य असलेलं परमपूज्य बाबाजींनी दिलेली अनुष्ठान परंपरा यासाठी जवळपास ११००० भाविक यामध्ये पुरुष व माता-भगिनी यांचा सहभाग असून आठ दिवस मौनवृत्तामध्ये राहून परमपूज्य बाबाजींनी दिलेला अनुग्रह याचा ते जप करतील यांच्या व्यवस्थेसाठी १ लाख स्क्वेअर फुटाचा वैजापूर येथील शर्मा मंडप यांचा


**दि.२५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर सोहळ्याचे आयोजन**

वॉटरप्रूफ भव्य मंडप लावण्यात आले आहे. दुसरी महत्त्वाची परंपरा परमपूज्य बाबाजींनी जी दिली आहे.

ती यज्ञ यासाठी राजस्थानी शैलीतील राजस्थानी कारागिरांनी बनवलेला बांबू व गवत या पासून जवळ पास दोन एकर मध्ये भव्य मंडप उभारण्यात आला आहे या यज्ञ मंडपामध्ये ७७५१ कुंड याची निर्मिती केली असून आठ दिवस या यज्ञामध्ये जवळपास २५ हजार भाविक सपत्नीक सहभागी होऊन यज्ञाचा लाभ घेतील या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे बाबाजींनी दिलेली श्रमदान परंपरा यानुसार १ कोटी तास श्रमदानाची नोंद होणार आहे अनुष्ठानासाठी बसणाऱ्या ११००० भाविकांकडून १११ कोटी जप होणार आहे यज्ञासाठी बसणारे २५००० भाविकाकडून सव्वा कोटी यज्ञ आहुती म्हणजे हवन होणार आहे. यासोबत या सोहळ्यामध्य अखंड नंदादीप, नामस किर्तन, अभिषेक, एकनाथी भागवत पारायण व दररोज येणाऱ्या लाखो भाविकांसाठी अखंड अन्नदान त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व आरोग्याची व्यवस्था याचे नियोजन केले आहे. यासाठी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जय बाबाजी भक्त परिवारातील विविध समित्या कार्यरत आहे महान संतांच्या पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये लाखो भाविकांच्या उपस्थितीत होणारे अनुष्ठान व यज्ञकर्म याचे फळ हे भारत मातेच्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे असे पत्रकार परिषदेमध्ये जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या वतीने सांगण्यात आले या पवित्र सोहळ्यामध्ये आर्किटेक महेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार स्वाती नरेंद्र सोळुंके निर्मित परमपूज्य बाबाजींची २१ फुटाची मूर्ती भगवान शिवांची १६ फुटाची मूर्ती भगवान पांडुरंगाची १५ फूट उंचीची मूर्ती यासोबत अखंड हिंदुस्तानचा आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचा पूर्ण कृती पुतळा व महाराणा प्रताप यांचा पूर्ण कृती पुतळा याचे दर्शन सुद्धा या सोहळ्यामध्ये होणार असून यासाठी सुशोभीकरणाचे काम साकला नर्सरीचे श्री सुरेश शेठ सागला हे करणार आहे.

अशा या वैशिष्ट्यपूर्ण सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील लाखो भाविकांनी तन मन धनाने सहभागी होऊन ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांचा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले या पत्रकार परिषदेला उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती यासोबत आश्रमिय संत शिवेश्वर गिरी महाराज महिंद्र गिरी महाराज व नित्यानंद महाराज हे उपस्थित होते यासोबत या सोहळ्याची उभारणी प्रमुख डी सी गायकवाड, संदीप मोडके नाशिक येथील सुभाष भाऊ पोरजे, मंगेश भाऊ डेरले, केशव गोसावी व श्रमदानासाठी उपस्थित जय बाबाजी फक्त परिवारातील भाविकांची मोठी उपस्थिती होती.

# प्रभाग क्र.11 येथे भव्य महाआरोग्य शिबीर संपन्न; शेकडो नागरिकांनी घेतला तपासणी व उपचारांचा लाभ



या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून नागरिकांची मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांसाठी रक्तदाब (बी.पी.), नाडीगती, तापमान, उंची, वजन, बीएमआय (BMI), शरीरातील सूज, पिवळेपणा, थकवा आदी लक्षणांची सखोल तपासणी करण्यात आली.

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल यांच्या सहकार्याने सिडको येथील सुवर्णकार मंगल कार्यालय, एन-६ (तेरना हायस्कूल समोर) प्रभाग क्र. ११ येथे रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. हे शिबीर सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत पार पडले. अजिंक्य सावे यांच्या प्रमुख उपस्थित शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

तसेच नर्व्हस सिस्टीम तपासणी अंतर्गत डोकेदुखी, चक्कर येणे, मेंदूशी संबंधित प्राथमिक तपासणी करून आवश्यक रुग्णांना पुढील उपचारांसाठी संदर्भ (रेफरल) देण्यात आले. नेत्र व श्वसन तपासणीची विशेष सुविधा- या शिबिरात मोफत नेत्र तपासणी करण्यात आली तसेच गरजू रुग्णांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. श्वसन प्रणालीच्या तपासणीत फुफ्फुसांची तपासणी, खोकला, सर्दी, दम लागणे, अस्थमा, ब्राँकायटिस यासंबंधी तपासणी करण्यात आली.

**विशेष उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक**

सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा मोलाचा सहभाग- या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले. अमेय देशमुख, हुशारसिंग चव्हाण, अरुण पालवे, मयूर वंजारी, नितीन खरात यांच्यासह किरण पाटील, प्रशांत नांदेडकर, विश्वनाथ स्वामी, नारायण अण्णा सुरगुणिवार, विलास कोरडे, राहुल गाडीवान, अरुण राऊत, श्रीनिवास देव, विजय सिदे, विजय हिंगे, सुभाष लोखंडे, अविनाश पवार, सुधीर शेवाळे, अनिल जाधव, सोनू तोतरे, दिगंबर सातव, दिनेश गवारे, सुमित सूर्यवंशी, गजानन हेकाळे, संदीप जावळे, सचिन चव्हाण, परसराम सतणे, संदीप आळीने, दिनेश काटोदे, विवेक देशपांडे, राहुल दहिकळ, चंद्रशेखर वाघमारे, मोहन पोटे, संतोष ओणे, दीपक लोहारवाडकर, मनीष खानापुरे, मयूर गुरव, देवानंद पाटील, योगेश पाटील, मयूर शिंदे, शुभम पगार, सचिन आभोळे, अर्जित कासार, प्रदीप भुयार, नरेश वालुंज, लक्ष्मीताई गायकवाड, उषाताई काळे, प्रवीणताई राजपूत, विद्याताई गायकवाड, शुभांगीताई दाभाडे, आशाताई वानखेडे, जयंता ताई पांडे, चंपावतीताई झुंजकर, छायाताई सोनवणे, राधिकाताई जाधव, मनोज उक्षताना यांचा विशेष सहभाग होता.

शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद- या महाआरोग्य शिबिरास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. आयोजकांकडून नागरिकांना पुढील काळातही अशा प्रकारची सामाजिक बांधिलकी जपणारी आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

# स्थानिक स्वराज्य निवडणुकांत भाजप जोरदार मुसंडी मारेल-डॉ. उज्जवला दहीफळे



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

माजी महापौर बापू घडामोडे व महिला मोर्चा शहर अध्यक्षा सौ. उज्ज्वला दहिफळे यांच्या प्रमुख उपस्थितीत चिकलठाणा-मुकुंदवाडी मंडळातील तसेच वॉर्डमधील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन नवीन नियुक्त्या करण्यात आल्या. त्यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणे होते महिलांमध्ये जनजागृती मतदानाविषयी जनजागृती करणे तसेच महिलांचे प्रश्न प्रामुख्याने महिलांनी मांडले पाहिजे याविषयी महिलांना मार्गदर्शनही या बैठकीचे निमित्ताने करण्यात आले तसेच मतदानाविषयी हे सूचनाही मान्यवरांकडून देण्यात आल्या. स्थानिक स्वराज्य निवडणुकांत देखील भाजप जोरदार मुसंडी मारेल असा विश्वास डॉ. उज्ज्वला दहीफळे यांनी बोलून दाखविला.

**चिकलठाणा- मुकुंदवाडी मंडळाची बैठक उत्साहात संपन्न; पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र**

याच पार्श्वभूमीवर राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे यांनी पक्षाच्या एका कार्यक्रमात बोलताना सांगितले की आपल्या पक्षात वरिष्ठांचा आदेश महत्त्वाचा आहे. पक्षाशी एकनिष्ठ असतो त्याचा विचार जरूर पक्ष योग्य वेळ आल्यावर करतो त्यामुळे पक्षाशी निष्ठेने वागले पाहिजे आपला पक्ष देशात प्रथम क्रमांक चा पक्ष आहे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांत देखील पक्ष जोरदार मुसंडी मारेल. त्यानिमित्त सर्व कार्यकर्त्यांना मी माझ्यातर्फे शुभेच्छा देतो व जोमाने कामाला लागा अशा सूचना त्यांनी पक्षांच्या पदाधिकारी कार्यकर्ते व भावी नगरसेवकांना राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे दिल्या. त्यामुळे या बैठकीतही वरिष्ठांच्या आदेशानुसारच माजी महापौर बापू घडामोडे व महिला मोर्चा शहर अध्यक्षा सौ. उज्ज्वला दहिफळे व सर्व पदाधिकारी कार्य करीत आहे. म्हाडा कॉलनी येथे झालेल्या बैठकीत चिकलठाणा-मुकुंदवाडी मंडळाचे अध्यक्ष सुनील जगताप, दीपक खोतकर, किसान ठुबे, बळीराम कदम, सौ. सुनीता अवरादे, सौ. सुनीता साळुंके, सौ. वंदनाताई शहा, सौ. कविताताई देशमुख, सौ. अनिता सुरवसे, तसेच सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. बैठक यशस्वीरीत्या संपन्न झाल्याबद्दल भाजपा महिला मोर्चा चिकलठाणा - मुकुंदवाडी मंडळ अध्यक्षा सौ. उषा बळीराम कदम यांनी मान्यवरांचे व महिलांचे आभार मानले

# अर्जुन साबळे यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



अर्जुन उत्तमराव साबळे वय ४५ वर्ष राहणार डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर गल्ली नंबर १४ यांचे आज दिनांक २४/११/२०२५ रोजी अल्पशा आजाराने सकाळी ०४:००च्या सुमारास दुःखद निधन झाले आहे.

त्यांच्यावर सकाळी ११:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार/ अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पक्षात पत्नी एक मुलगा दोन मुली तीन बहिणी मेहुणे असा मोठा परिवार आहे सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई उत्तमराव साबळे यांचा तो मुलगा होता. यावेळी समाजीक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञान संदीप शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केले.

# कचरू म्हस्के यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



कचरू धोंडीबा म्हस्के वय ८७ वर्षे रा. रिधोरा ता. भोकरदन जि. जालना यांचे आज दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ वार मंगळवारी वृद्धपकाळाने सकाळी ०५:३० वाजेच्या सुमारास निधन झाले आहे.

त्यांची अंत्ययात्रा मुलगी आयु. सुनिता भीमराव शेजुळ इंद्रिरा मार्केट, सिडको एन ७, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्या निवासस्थानापासून निघून त्यांच्या प्रेतावर अंतिम संस्कार/ अंत्यविधी आज दुपारी ०३:३० वाजेच्या सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर सिडको नवीन मोंढा रोड येथील स्मशानभूमीत करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे. बाबांना सोनवणे परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली.

# एमआयटी कॉलेजमध्ये 'हिंद की चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५०व्या शहादत शताब्दीनिमित्त विशेष कार्यक्रम



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

एमआयटी कॉलेजमध्ये द खालसा फाउंडेशनच्या सहकार्याने 'हिंद की चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५०व्या शहादत शताब्दीनिमित्त एक विशेष शैक्षणिक आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित केला गेला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना गुरु साहिब यांच्या अद्वितीय बलिदान, मानवता, सत्य आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या तत्त्वांविषयी जागरूक करणे हा होता.

कार्यक्रमात द खालसा फाउंडेशनचे सचिव सरबजीत सिंग यांनी ४५ मिनिटांची सविस्तर ऑडिओ-व्हिडिओ सादरीकरण दिले.

आपल्या भाषणात त्यांनी गुरु तेग बहादुर साहिब जी यांना 'हिंद की चादर' का म्हटले जाते, याचा अर्थ स्पष्ट केला.

चांदनी चौक येथे दिलेल्या त्यांच्या शहादतीला मानवी अधिकारांच्या संरक्षणाचे जगातील अद्वितीय उदाहरण म्हणून संबोधले. गुरु साहिब यांच्या निडरता,करुणा,सत्यता आणि धार्मिक स्वातंत्र्य या शिकवणींचा आजच्या तरुणांच्या जीवनाशी संबंध जोडला.

विद्यार्थ्यांना संदेश दिला की 'सामर्थ्य त्याचं असतं, जे इतरांसाठी उभं राहतं, आणि धर्म तोच असतो ज्यात मानवतेचे रक्षण असते. त्यांचे प्रेरणादायी भाषण विद्यार्थ्यांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेले. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये होते. श्री मुनीश शर्मा, जनरल सेक्रेटरी, एमआयटी कॉलेज डॉ. निलेश पाटील, संचालक डॉ. अनिल रावत, डीन (विद्यार्थी विकास) सरदार हरिसिंह जी, एजेव्हिएम आर्किटेक्ट कुलदीपकौर भाटिया द खालसा फाउंडेशनकडून अध्यक्ष राजविंदरसिंग धोडी,सचिव सरबजीतसिंग,मनबीरसिंग आणि नवजिंदरसिंग हे उपस्थित होते आणि त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात विशेष भूमिका बजावली. कॉलेज प्रशासनाने या उपक्रमाचे कौतुक केले आणि म्हटले की अशा मूल्याधारित कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, धैर्य आणि भारताच्या आध्यात्मिक वारशाबद्दल आदरभाव अधिक मजबूत होतो.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199